# फुलंब्री नगरपंचायत कार्यालय, फुलंब्री
## ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

फोन नं. ०२४०-२६३३३३८ e-mail:-phulambri.nagar.panchyat@gmail.com

जा. क्र./नपंफु/पा.पु.वि./कावी/५१६/२०२२ दिनांक : १८/११/२०२२

# जाहीर सूचना

या जाहीर सूचनेद्वारे माहिती प्रसिद्ध करण्यात येते की, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत घेण्यात येणाऱ्या स्वच्छ सर्वेक्षणाकरिता नगरपंचायत, फुलंब्रीला मदत करण्याकरिता एकत्रित वेतनावर तात्पुरत्या स्वरूपात केवळ ११ महिन्यांसाठी शहर समन्वयक (City Coordinator) यांची नियुक्ती करावयाची आहे. तरी इच्छुक पात्र उमेदवारांकडून पदाकरिता दिनांक २५/११/२०२२ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत नगरपंचायत,फुलंब्री, जि. औरंगाबाद येथे विहित नमुन्यात अर्ज, आवश्यक त्या शैक्षणिक, अनुभव प्रमाणपत्रे व इतर आवश्यक कागदपत्रांसह सीलबंद लिफाफ्यात अर्ज स्वीकारण्यात येतील. विहित मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच पदभरती बाबतच्या सर्व अटी व शर्ती नगर पंचायत, फुलंब्री कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळतील, तसेच प्राप्त करता येतील. अर्ज छाननीअंती पात्र उमेदवारांना मुलाखतीचा दिनांक व वेळ स्वतंत्ररीत्या ईमेलद्वारे कळविण्यात येईल.

| पदाचे नाव | एकूण पदे | एकत्रित मासिक मानधन (सर्वकपातीसह) | शैक्षणिक पात्रता व अनुभव | वयोमर्यादा | अर्ज सादर करण्याची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| शहर समन्वयक (City Coordinator) | ०१ | ४५,०००/- | १. मान्यताप्राप्त विद्यापीठातील खालीलपैकी कोणत्याही शाखेतील<br>a) बी.ई./बी.टेक (कोणतीही शाखा)<br>b) बी.आर्क<br>c) बी. प्लॅनिंग<br>d) बी.एस्सी. (कोणतीही शाखा)<br>२. अनुभव- स्थानिक स्वराज्य संस्था (नागरी) कार्यालयाशी निगडित कामाचा किमान सहा महिन्यांचा अनुभव आवश्यक आहे. शहर समन्वयकच्या व्यतिरिक्त स्वच्छ सर्वेक्षण/ घनकचरा व्यवस्थापन/ पर्यावरण विभागात काम करण्याचा अनुभव धारण केलेल्या उमेदवारास प्राधान्य. | कमाल वयोमर्यादा ३५ वर्षे (शहर समन्वयक म्हणून अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारास अनुभव वयोमर्यादा शिथिल करता येईल.) | दिनांक १८/११/२०२२ ते २५/११/२०२२ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, फुलंब्री**